


| वर्ष - 9 । अंक -58 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

**आतील पानांत**

- हरमनप्रीतने घडवला इतिहास
- जबड्यातून इंग्लंडने हिसकावला विजय
- मेणबत्त्यांवर इतका खर्च का?
- इच्छुकाने फाडले स्वतःचेच कपडे

www.mahaenews.com । सोमवार, दि. 20 ऑक्टोबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी: महाराष्ट्रासाठी 1,566.40 कोटींची मंजुरी

# केंद्राकडून मदतीच्या दुसऱ्या हप्त्याची घोषणा

## केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे; राज्य सरकारलाही आर्थिक मदतीचा मोठा आधार

। मुंबई । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**राज्यातील ओल्या दुष्काळाने आणि अतिवृष्टीने त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांसाठी केंद्र सरकारकडून मोठा दिलासा मिळाला आहे. केंद्र सरकारने महाराष्ट्रासाठी एनडीआरएफ अंतर्गत 1,566.40 कोटी रुपयांचा दुसरा अग्रिम हप्ता मंजूर केला आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असून राज्य सरकारलाही आर्थिक मदतीचा मोठा आधार मिळणार आहे..**



केंद्रीय गृहमंत्री आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी महाराष्ट्र आणि कर्नाटक या राज्यांसाठी एकूण 1,950.80 कोटी रुपयांची आर्थिक मदत मंजूर केली आहे. यातून महाराष्ट्रासाठी 1,566.40 कोटी रुपये आणि कर्नाटकसाठी 384.40 कोटी रुपये देण्यात येणार आहेत. केंद्र सरकारकडून ही मदत 2025-26 या आर्थिक वर्षासाठी एसडीआरएफच्या केंद्रीय हिश्श्याचा दुसरा आगाऊ हप्ता म्हणून देण्यात आली आहे.

### अतिवृष्टी आणि पुरामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

यंदाच्या नैऋत्य मान्सूनदरम्यान मराठवाडा, सोलापूर आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांमध्ये परतीच्या पावसामुळे मोठे नुकसान झाले. अनेक शेतकऱ्यांच्या शेतांतील पिके पाण्याखाली गेली. सोयाबीन, कापूस, तूर, कांदा आणि इतर हंगामी पिकांचे मोठे नुकसान झाले. अनेक शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागली, तर काहींना संपूर्ण हंगाम वाया गेला.

राज्य सरकारने नुकतेच अशा शेतकऱ्यांसाठी 2,215 कोटी रुपयांचे आर्थिक पॅकेज जाहीर केले होते. यापूर्वी राज्य सरकारने एकूण 31 हजार कोटी रुपयांच्या मदतपॅकेजची घोषणा केली होती. त्याच पार्श्वभूमीवर केंद्र सरकारकडून मिळालेला हा दुसरा हप्ता राज्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

### 2025-26 या आर्थिक वर्षासाठी केंद्र सरकारने आतापर्यंत

एसडीआरएफ अंतर्गत 27 राज्यांना 13,603.20 कोटी रुपये,
एनडीआरएफ अंतर्गत 15 राज्यांना 2,189.28 कोटी रुपये,
राज्य आपत्ती निवारण निधी (SDMF) अंतर्गत 21 राज्यांना 4,571.30 कोटी रुपये, आणि
राष्ट्रीय आपत्ती निवारण निधी (NDMF) अंतर्गत 9 राज्यांना 372.09 कोटी रुपये
असे एकूण 20,700 कोटी रुपयांहून अधिक निधीचे वाटप केले आहे.

### एनडीआरएफ आणि एसडीआरएफ निधीचे वाटप

देशातील नैसर्गिक आपत्ती, पूर, दुष्काळ, अतिवृष्टी किंवा भूकंप अशा परिस्थितीत नागरिकांना मदत करण्यासाठी केंद्र सरकारतर्फे एनडीआरएफ (National Disaster Response Fund) आणि एसडीआरएफ हे दोन प्रमुख निधी तयार करण्यात आले आहेत.

या निधीच्या माध्यमातून केंद्र आणि राज्य सरकारे संयुक्तरीत्या आपत्तीग्रस्त भागांतील लोकांना आर्थिक मदत, पुनर्वसन आणि पुनर्बांधणीसाठी साहाय्य पुरवतात.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यांना केंद्र सरकारने नुकतीच दिलेली आगाऊ मदत हा त्याच निधीचा भाग आहे.

### मुख्यमंत्री फडणवीस यांचे पंतप्रधान व अमित शाह यांना आभार

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व मुख्यमंत्रीपदाचा कारभार सांभाळणारे देवेंद्र फडणवीस यांनी या निर्णयाबद्दल केंद्र सरकारचे आभार मानले आहेत. त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत म्हटले आहे की – "मान्सूनच्या काळात शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीबद्दल मदत म्हणून केंद्र सरकारने एनडीआरएफचा दुसरा अग्रिम हप्ता म्हणून आणखी 1,566.40 कोटी रुपये महाराष्ट्रासाठी मंजूर केले आहेत. मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी आणि केंद्रीय गृहमंत्री मा. अमितभाई शाह यांचा मी नितांत आभारी आहे. ही अग्रिम मदत असून अंतिम मदतीसंदर्भातील प्रक्रिया अजून सुरू आहे."

मुख्यमंत्र्यांनी पुढे म्हटले की, केंद्र आणि राज्य सरकार दोन्हीही मिळून शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहेत. नुकसानग्रस्त भागातील पंचनामे पूर्ण होऊन, शेतकऱ्यांना योग्य ती मदत लवकर पोहोचवली जाईल.

### केंद्र-राज्य समन्वयातून शेतकऱ्यांना आधार

राज्यातील शेतकऱ्यांवर ओल्या दुष्काळाचे मोठे संकट कोसळले होते. अनेक ठिकाणी पिके नष्ट झाल्यामुळे शेतकऱ्यांचे कर्जबाजारीपण वाढले. अशा वेळी राज्य सरकारकडून 2,215 कोटी रुपयांची तातडी मदत आणि आता केंद्राकडून 1,566.40 कोटी रुपयांची मंजुरी — यामुळे एकूण 3,700 कोटी रुपयांहून अधिक रकमेचा आर्थिक दिलासा शेतकऱ्यांना मिळणार आहे.

या निर्णयामुळे जिल्हा प्रशासनांना आणि कृषी विभागाला निधी वाटपाची प्रक्रिया वेगाने पूर्ण करता येणार असून, शेतकऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये थेट अनुदान रकमेचा भरणा करण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

केंद्र सरकारने ही मदत "अग्रिम हप्ता" म्हणून दिली असून, राज्य सरकारकडून अंतिम अहवाल आल्यानंतर पुढील मदतपॅकेज मिळण्याची शक्यता आहे.

### शेतकऱ्यांमध्ये समाधानाची भावना

राज्याच्या ग्रामीण भागात ही बातमी पसरताच शेतकऱ्यांमध्ये दिलासा व समाधानाची भावना निर्माण झाली आहे. मराठवाडा, विदर्भ आणि सोलापूर भागातील शेतकरी म्हणत आहेत की, केंद्र आणि राज्य सरकार दोन्ही मिळून मदतीसाठी पुढे येत असल्याने आशेचा किरण दिसत आहे.

## काँग्रेसची जोरदार टीका

## नमाज पठण केले; भाजपावाल्यांनी गोमूत्र शिंपडले

# शनिवार वाड्यात मस्तानीही राहिली होती

## कपाळावर हात मारायची वेळ आली

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शनिवार वाड्यात नमाज पठणाचा व्हिडीओ समोर आल्याने पतित पावन संघटनेने मेधा कुलकर्णी यांच्या नेतृत्वात आंदोलन केलं आणि ज्या ठिकाणी नमाज पठण झालं त्या ठिकाणी गोमूत्र शिंपडून शुद्धीकरण करण्यात आलं. शनिवार वाडा हे मराठा साम्राज्याचं प्रतीक आहे तिथे आम्ही असले प्रकार सहन करणार नाही असं म्हणत मेधा कुलकर्णींनी इशारा दिला आहे.**




यानंतर आता काँग्रेस प्रवक्ते सचिन सावंत यांनी पोस्ट लिहून मस्तानीही त्या वाड्यात राहिली होती. विधात्याचे नाव घेतलं तर पोटात का दुखलं? असा सवाल सचिन सावंत यांनी विचारला आहे. पुण्याचे वैभव – शनिवार वाडा ऐतिहासिक वारसा स्थळ की गैर हिंदू प्रार्थना स्थळ? सारसबाग येथे झालेल्या नमाज पठणाच्या घटनेनंतर शनिवार वाड्यात घडलेला प्रकार हा प्रत्येक पुणेकरासाठी चिंतेचा आणि संतापाचा विषय! पुणे प्रशासन नक्की करते काय? आपल्या वारसा स्थळांचा सन्मान कुठे हरवतोय? चला, आपण सर्वजण एकत्र येऊ आणि शिव वंदना करून आपल्या संस्कृतीचा सन्मान जपूया! अशी पोस्ट लिहून मेधा कुलकर्णी यांनी आंदोलन स्थळी जाऊन सदर कृतीचा निषेध केला आहे.शनिवार वाड्यात जिथे आम्ही आलो आहोत याच ठिकाणी नमाज पठण करण्यात आलं. शनिवार वाडा हे ऐतिहासिक ठिकाण आहे. मराठा साम्राज्याचा विस्तार अटक ते कटक जो झाला तो ज्या केंद्रातून चालवला गेला ते ऐतिहासिक ठिकाण हे आमच्या विजयाचं प्रतीक आहे. मुघलांचा नाश या ठिकाणी झाला. तेच इथं येऊन नमाज पठण करत असतील तर आमचं त्यांना आवाहन आहे. तुम्ही ज्या नाईलाजास्तव हिंदू धर्म सोडून धर्मांतर केलं आहे तुम्ही पुन्हा हिंदू धर्मात परत या. त्याच धर्मात राहायचं असेल तर तुमच्या घरी किंवा मशिदीत नमाज पठण करा. सार्वजनिक ठिकाणी किंवा ऐतिहासिक ठिकाणी येऊन नमाज पठण करु नका. कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल असं वागू नका. यापुढे आम्ही हे खपवून घेणार नाही. पतित पावन संघटना या ठिकाणी शुद्धीकरण करुन शिववंदना गाणार आहे. तसंच पूर्वी या ठिकाणी माघी गणेश उत्सव साजरा होत होता तो पुन्हा सुरु करावा अशी मागणी मी करते आहे असंही मेधा कुलकर्णी यांनी म्हटलं आहे.मुस्लिम महिलांनी शनिवार वाड्यात नमाज पठण केले म्हणून भाजपावाल्यांनी गोमूत्र शिंपडले हे पाहून कपाळावर हात मारायची वेळ आली. अरे बाबांनो त्या शनिवार वाड्यात मस्तानीही राहिली आहे. पेशव्यांच्या सरदारांनीच छत्रपतींचा जरीपटका काढून युनियन जॅक फडकावला होता. अशा ठिकाणी विधात्याचे नाव त्या महिलांनी घेतले तर यांच्या पोटात दुखायला लागले. तुम्हाला तीथे जप करत बसायला कोणी अडवले आहे का? समोर आणि बाजूला दर्गा आहे तो ही पेशवेकालीन! पेशव्यांना त्यांची अडचण नव्हती पण तुम्हाला असेल तर हवा त्या दर्ग्यांना शिवून येते म्हणून आपल्या नाकातही गोमूत्र घालणार का? यानंतर आता काँग्रेस प्रवक्ते सचिन सावंत यांनी पोस्ट लिहून मस्तानीही त्या वाड्यात राहिली होती. विधात्याचे नाव घेतलं तर पोटात का दुखलं? असा सवाल सचिन सावंत यांनी विचारला आहे. पुण्याचे वैभव – शनिवार वाडा ऐतिहासिक वारसा स्थळ की गैर हिंदू प्रार्थना स्थळ? सारसबाग येथे झालेल्या नमाज पठणाच्या घटनेनंतर शनिवार वाड्यात घडलेला प्रकार हा प्रत्येक पुणेकरासाठी चिंतेचा आणि संतापाचा विषय! पुणे प्रशासन नक्की करते काय? आपल्या वारसा स्थळांचा सन्मान कुठे हरवतोय? शिव वंदना करून आपल्या संस्कृतीचा सन्मान जपूया! अशी पोस्ट लिहून मेधा कुलकर्णी यांनी आंदोलन स्थळी जाऊन सदर कृतीचा निषेध केला आहे.

### तुम्ही नाईलाजास्तव हिंदू

याच ठिकाणी नमाज पठण करण्यात आलं. शनिवार वाडा हे ऐतिहासिक ठिकाण आहे. मराठा साम्राज्याचा विस्तार अटक ते कटक जो झाला तो ज्या केंद्रातून चालवला गेला ते ऐतिहासिक ठिकाण हे आमच्या विजयाचं प्रतीक आहे. मुघलांचा नाश या ठिकाणी झाला. तेच इथं येऊन नमाज पठण करत असतील तर आमचं त्यांना आवाहन आहे.

# लक्ष्मीपूजनाच्या दिवशी मेट्रो ६ नंतर बंद

## बुधवारी नियोजित वेळेनुसार सेवा, महामेट्रोचा निर्णय

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**दिवाळीनिमित्त मंगळवारी (२१ ऑक्टोबर) सायंकाळी सहा वाजल्यानंतर मेट्रो बंद ठेवण्यात येणार आहे. लक्ष्मीपूजनानिमित्त पहाटे सहा ते सायंकाळी सहा वाजेपर्यंतच दोन्ही मार्गांवरील सेवा कार्यरत ठेवण्याचा निर्णय मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने (महामेट्रो) घेतला आहे. बुधवार (२२ ऑक्टोबर) पासून रात्री ११ वाजेपर्यंत सेवा सुरू राहणार असल्याचे महामेट्रोने जाहीर केले.**



दिवाळी सणानिमित्त शाळा-महाविद्यालय, खासगी, सरकारी कार्यालयांना पुढील तीन ते चार दिवस सुट्या आहेत. त्यातच पुण्यात नोकरी, व्यवसाय, शिक्षण, रोजगारानिमित्त परगावावरून आलेल्यांची संख्या सर्वाधिक आहे. सुट्या असल्याने मूळ गावी किंवा पर्यटनासाठी बाहेर गेलेल्यांचे प्रमाणही तेवढ्याच प्रमाणात आहे.

दर वर्षी दिवाळीमध्ये दोन ते तीन दिवस सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला मागणी नसते.स्वारगेट ते पिंपरी चिंचवड (पर्पल लाइन) आणि वनाज ते रामवाडी (एक्वा लाइन) या मार्गांवर दैनंदिन पहाटे सहा ते रात्री ११ वाजेपर्यंत अखंडित १७ तास मेट्रो धावत असते.

मेट्रोकडे एकूण ३४ गाड्या असून, प्रति सहा ते सात मिनिटांनी अशा दिवसभरातून सरासरी ५५४ फेऱ्या होतात.

यापैकी पर्पल लाइनवर ३००, तर एक्वा लाइनवर २५४ फेऱ्या होतात. मात्र, २१ ऑक्टोबर रोजी केवळ १२ तासांपुरतीच सेवा असल्याने दिवसभरातून अंदाजे ३५०-४०० फेऱ्या (३० ते ४० टक्के) कमी होण्याची शक्यता महामेट्रोकडून वर्तविण्यात आली. पुणे मेट्रोची दैनंदिन प्रवासी संख्या सरासरी दोन लाखांपर्यंत असते.

### प्रवाशांच्या साहित्याची तपासणी

मागील दिवाळीच्या सुट्यांमध्ये तब्बल १ ते सव्वा लाखाने प्रवासी संख्येत घट झाल्याचे समोर आले. त्यातच लक्ष्मीपूजनानिमित घरोघरी उत्सव सुरू असल्याने महामेट्रोने मंगळवारी सायंकाळी सहानंतर मेट्रो सेवा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.ज्वलनशील पदार्थांची वाहतूकप्रवाशांच्या साहित्याची वेळोवेळी तपासणी करण्यात येणार असून ज्वलनशील पदार्थ आढळून आल्यास संबंधित प्रवाशांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याच्या सूचना महामेट्रोकडून करण्यात आल्या आहेत.

खोपोलीत राष्ट्रवादीची बैठकीत

अजित पवारांचे कार्यकर्ते आक्रमक

# महायुती नकोच; राष्ट्रवादी कार्यकर्त्यांचा स्वबळाचा नारा

## परिस्थिती अनुकूल नसल्यास महायुती सोबत राहण्याचा पक्षश्रेष्ठींचा बैठकीत सल्ला

।पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महापालिका निवडणुकीची चाहूल लागताच शहरातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाची खोपोलीत प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच बैठक झाली. त्यात शहरातील पदाधिकाऱ्यांनी महापालिका निवडणूक महायुतीसोबत नको तर स्वबळावर लढवू अशी आक्रमक भूमिका मांडली. राष्ट्रवादीतून भाजपमध्ये जाण्यास उत्सुक असणाऱ्यांचीही यावेळी उपस्थिती होती.**



उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शहरात पकड अधिक मजबूत करण्यासाठी जनसंवाद कार्यक्रमांची मालिका सुरू केली आहे. पिंपरी आणि चिंचवड दोन्ही विधानसभा मतदारसंघांतील भेटीगाठी, सभा आणि कार्यकर्त्यांशी संपर्क या माध्यमातून त्यांनी कार्यकर्ते, जुने पदाधिकारी यांनी जुळवाजुळव सुरू केली आहे. यामुळे स्थानिक पातळीवर कार्यकर्त्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला आहे. मात्र, स्वबळावर लढायचे की महायुतीतून याचा निर्णय झालेला नाही. परंतु शहरातील पदाधिकाऱ्यांनी यंदाची निवडणूक महायुतीसोबत न लढविता स्वबळावर लढवण्याचा आग्रह धरण्याचे दिसून येत आहे.

या पार्श्वभूमीवर खोपोलीत प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच बैठक झाली. बैठकीला पिंपरी-चिंचवड शहरातील पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. त्यात स्वबळाचा नारा देण्यात आला.

**परिस्थिती पाहून निर्णय घेणार**

निवडणुकीत पदाधिकाऱ्यांनी स्वबळाचा नारा दिला असला, तरीही खोपोलीतील बैठकीला उपस्थित असलेले काही नेते भाजपमध्ये जाण्याच्या तयारीत आहेत, अशी चर्चा आहे. अनेकजण कधी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यक्रमांच्या मंचावर तर कधी भाजपच्या कार्यक्रमांमध्ये पाहायला मिळत आहेत. परंतु या प्रकारामुळे पक्षाचा कार्यकर्ता मात्र आपण नक्की कोणासाठी काम करायचे याबाबत संभ्रमात असल्याचे चित्र दिसत आहे. द्विधा मनस्थिती असणाऱ्या या नेत्यांनी बैठकीत हजेरी लावली होती. स्वबळाची भाषा करताना आपला निर्णय चुकत तर नाही ना? याची चाचपणी त्यांनी केली असल्याचे बोलले जात आहे.

### तर महायु तर महायुतीसोबत...!

जर अंदाज अनुकूल नसतील तर पुन्हा त्याच पक्षाशी हातमिळवणी करावी लागणार आहे. मात्र, महायुतीबाबत निर्णय काहीही होवो, राष्ट्रवादीचा अजित पवार गट शहरात संघटन मजबूत करण्याच्या तयारीत आहे. दरम्यान, काही नेते भाजपच्या दरवाजाकडे डोळे लावून बसले असल्यामुळे शहरातील राजकारण आणखी रंगतदार होणार आहे. पिंपरी-चिंचवडला भेटीगाठी, सभा आणि कार्यकर्त्यांशी संपर्क या माध्यमातून त्यांनी कार्यकर्ते, जुने पदाधिकारी यांनी जुळवाजुळव सुरू केली आहे. यामुळे स्थानिक पातळीवर कार्यकर्त्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला आहे.

# वीज समस्या सोडवण्यासाठी नवीन “ट्रान्सफॉर्मर”

## बोऱ्हाडेवाडी परिसरातील परिसरातील नागरिकांना अखंडित वीज पुरवठासाठी प्रयत्न

।पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भोसरी विधानसभा मतदारसंघातील बोऱ्हाडेवाडी परिसरातील नागरिकांचा लवकरच वीज भार कमी होऊन सुलभ आणि अखंडित वीजपुरवठा मिळणार आहे. भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने आणि महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या (MSEB) NSC योजनेअंतर्गत बोऱ्हाडेवाडीतील पायाभूत वीज सुविधा बळकट करण्याचे काम वेगाने सुरू आहे..**

### भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश



राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली या भागातील समाविष्ट गावांतील पायाभूत सोयी-सुविधा सक्षम केल्या आहेत. यामुळे चिखली-मोशी-चऱ्होली रेसिडेन्सिअल कॉरिडॉरचा विकास झाला असून, त्या भागातील लोकसंख्या आणि वीज ग्राहकांची मागणी हळूहळू वाढत आहे.

> बोऱ्हाडेवाडी आणि आसपासच्या भागातील नागरिकांच्या वीजपुरवठ्याच्या समस्या लवकरच दूर होतील. 200 केव्हीए क्षमतेचा नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्याचे काम सुरू असून, यामुळे येथील वीज भार कमी होऊन वीज पुरवठा अधिक स्थिर आणि अखंडित होईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली चालू असलेल्या NSC योजनेतून हा प्रकल्प यशस्वी होत आहे. भोसरी उपकेंद्राचे चऱ्होली आणि दिघी असे विभाजन करण्यात आले आहे. आगामी काळात वीज समस्या निकालात काढण्यासाठी आम्ही सातत्यपूर्ण प्रयत्न करीत आहोत.
> **-- महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

वीज ग्राहकांच्या वाढत्या तक्रारींची दखल घेत. या भागात 200 केव्हीए क्षमतेचा नवीन ट्रान्सफॉर्मर बसविला जात असून, त्याचा थेट लाभ खालची बोऱ्हाडेवाडी, सुभाष चिमण बोराडे यांच्या घराजवळील 'फोर वे' पासून सिल्वर ब्लू हॉटेलच्या मागील संपूर्ण परिसर, तसेच शिर्के इंजिनिअरिंगकडे जाणाऱ्या एलटी लाईन आणि संत ज्ञानेश्वर कॉलनी या भागांना होणार आहे.

या भागांमध्ये सध्या वीज भार खूप वाढलेला असून, परिणामी अनेक वेळा लाईट व्होल्टेज कमी होणे, सप्लाय ट्रिप होणे अशा समस्या उद्भवत होत्या.

नवीन ट्रान्सफॉर्मर बसल्याने या सर्व समस्या दूर होतील आणि नागरिकांना स्थिर वीजपुरवठा मिळेल. यावर आमदार लांडगे यांनी वारंवार महावितरण आणि संबंधित विभागांशी पाठपुरावा करत या प्रकल्पाला मंजुरी मिळवून दिली. त्यांच्या या पाठपुराव्यामुळे अनेक नागरिकांना दिलासा मिळणार आहे.




**देशात लोकसभा निवडणूक २०२४ ची धामधूम सुरु आहे. मतदानाचे सात टप्पे आहेत. त्यातील चार टप्प्यातील मतदान झाले आहे. यापूर्वी इंडिया आघाडीशी फटकून वागणाऱ्या तृणमुल काँग्रेसच्या प्रमुख, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता दीदींनी पुन्हा खेला होबेचा नारा दिला आहे. त्यांचा सूर पालटला आहे. आता चार टप्प्यातील मतदानानंतर ममता बॅनर्जी यांनी रणनीती बदलविली आहे. त्यांनी इंडिया आघाडीला बाहेरुन पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे.**

# अखेर ममता दीदीचा सूर पालटला!



लोकसभा निवडणुकीपूर्वी बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी इंडिया आघाडीची कोनशिला ठेवली. पण इमारत फळाला येण्यापूर्वीच ते पुन्हा भाजपच्या ताफ्यात जाऊन बसले. जागा वाटपावरुन तृणमूल काँग्रेसने वेगळी चूल मांडली. देशात अनेक ठिकाणी बेबनाव दिसला. पण महाराष्ट्रासह काही भागात काँग्रेसला इतर पक्षांनी चांगली साथ दिली. भाजपची लाट थोपविण्यासाठी या प्रयोगाकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. चार जूनला लोकसभेचा निकाल हाती आल्यावर या इंडिया आघाडीचे यश-अपयश समोर येणार आहे. लोकसभा निवडणुकीच्या एकूण सात टप्प्यांपैकी चार टप्प्यातील मतदान पार पडले आहे. आणखी तीन टप्प्यातील मतदान बाकी असून ते लवकरच पार पडेल. आता पाचव्या टप्प्यासाठी २० मे रोजी मतदान होणार आहे. त्यामुळे सध्या सर्वच राजकीय पक्षांचा जोरदार प्रचार सुरू आहे. अशातच काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी केंद्रात इंडिया आघाडीचे सरकार येईल, असा दावा केला आहे. दुसरीकडे भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनी नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान होतील, असा दावा केला आहे. असे असतानाच आता तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्षा तथा पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी मोठी घोषणा केली आहे. इंडिया आघाडीला केंद्रात सरकार स्थापन करण्यासाठी तृणमूल काँग्रेस बाहेरून पाठिंबा देणार असल्याची भूमिका ममता बॅनर्जी यांनी जाहीर केली आहे.

भारतीय जनता पार्टीच्या विरोधात देशातील विरोधी पक्षांनी एकत्र येत इंडिया आघाडी स्थापन केली. या इंडिया आघाडीच्या माध्यमातून लोकसभा निवडणुका लढवल्या जात आहेत. मात्र, पश्चिम बंगालमध्ये मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी 'एकला चलो'चा नारा दिलेला आहे. कोणत्याही पक्षांबरोबर आघाडी केलेली नाही. मात्र, ममता बॅनर्जी यांनी इंडिया आघाडीशी नाते तोडलेलेही नाही. त्यामुळे ममता बॅनर्जी या इंडिया आघाडीमधून बाहेर पडल्याची चर्चा होती. मात्र, याबाबत आता ममता बॅनर्जी यांनी स्वत:च भूमिका जाहीर केली आहे. पश्चिम बंगालमध्ये लोकसभेच्या ४२ जागा आहेत. त्यातील १८ जागांवर मतदान प्रक्रिया झाली आहे. तर २४ जागांवर मतदान होणार आहे. त्याचवेळी ममता बॅनर्जी यांनी गुरुवारी एक मोठी घोषणा केली आहे. इंडिया आघाडीला बाहेरुन पाठिंबा देऊन केंद्रात एक मजबूत सरकार आणणार असल्याचे त्या म्हणाल्या. हे नवीन सरकार जनतेच्या प्राधान्याने अडचणी सोडवेल. ममता बॅनर्जी यांनी यापूर्वी डावे आणि काँग्रेसवर राज्यात भाजप समर्थक असल्याचा आरोप लावला होता. पण आता त्यांनी थोडी नमती भूमिका घेतली आहे. त्यामुळे राजकीय विश्लेषक बुचकाळ्यात पडले आहेत. लोकसभा निवडणुकीआधी ममता बॅनर्जी यांनी एकला चलोरेचा निर्णय घेतला होता. त्यामुळे काँग्रेसप्रणीत इंडिया आघाडीला मोठा झटका बसला होता. त्यावेळी इंडिया आघाडीच्या कळपातून पहिला पक्ष बाहेर निघाला होता. ममता बॅनर्जी यांनी इंडिया आघाडीला झटका दिला होता. त्यांनी पश्चिम बंगालमध्ये स्वबळावर निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला होता. त्यावेळी त्यांनी स्वबळावर निवडणूक लढविण्याची घोषणा केली. काँग्रेसने तृणमूलचा प्रस्ताव मानला नाही, म्हणून हा निर्णय घेतला असे त्यावेळी ममता बॅनर्जी यांनी सांगितले होते. लोकसभा निवडणुकीपूर्वीA टीएमसी आणि काँग्रेसमध्ये जागावाटपावरुन वादविवाद सुरु होते. ज्यावेळी दोन्ही पक्षांमध्ये एकमत झाले नाही, त्यावेळी तृणमूलने एकट्याने लोकसभा निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला. लोकसभा निवडणुकीआधी इंडिया आघाडीची पहिली विकेट पडली अशी देशभरात चर्चा झाली. काँग्रेस पक्षासोबत माझी कुठलीही चर्चा झाली नाही असे ममता बॅनर्जी यांनी त्यावेळी सांगितले होते. 'पश्चिम बंगालमध्ये आम्ही एकट्याने निवडणूक लढवणार हे सुरुवातीपासून आम्ही सांगत आलोय. आमची एक धर्मनिरपेक्ष पार्टी आहे' असेही त्या म्हणाल्या होत्या.

## प्रासंगिक »

### लक्ष्मीपूजन!

***प्रशासनाचे पूर्ण राजकीयीकरण झालेले आहे आणि निवडक नैतिकता पुरेपूर आहे तोपर्यंत आपल्या देशात भ्रष्टाचाऱ्यांचे पीक अमाप येणार...***

वसईसारख्या इटुकल्या शहराचे व्यवस्थापन करणारे दोन इटुकभर अधिकारी दीड-दोनशे कोटींची माया सहज जमा करतात. या दोन अधिकाऱ्यांच्या तुलनेत पंजाबचे पोलीस उपमहासंचालकपद चांगलेच मोठे. त्या पदावरील व्यक्तीही मग या मोठेपणास साजेसा गैरव्यवहार केल्याच्या आरोपाखाली पकडली जाते. छत्तीसगडचा एक 'आयएएस' अधिकारी पाचशे कोटी रुपयांचा धनी असल्याचे समोर येते. हे सर्व पुरुषांकडून होते, पुरुष अधिक भ्रष्ट असतात असे म्हणावे तर झारखंडमधील एक महिला आयएएस अधिकारी रोजगार हमी योजनेतील निधीवर इतका हात मारते की तिच्या कर्तृकीने थक्क व्हावे. आयएएस नसलेली उत्तर प्रदेशातील एक महिला अधिकारीही अशीच कर्तृत्ववान. राजकीय लागेबांधे, अमाप माया, मनसोक्त गैरव्यवहार इत्यादींमुळे या महिला अधिकाऱ्यास अखेर तुरुंगात डांबावे लागते.

कोणत्याही उत्सवाचा सामान्यांना जाच होऊ नये. मग तो कोणत्याही धार्मिक सणांचा असो की 'लोकशाहीचा उत्सव' म्हणवल्या जाणाऱ्या निवडणुकांचा. सार्वजनिक पातळीवर साजऱ्या होणाऱ्या या उत्सवात जनतेची कमीत कमी गैरसोय कशी होईल अथवा होणार नाही हे बघणे विविध प्रशासकीय यंत्रणांचे काम.

# जनतेची कमीत कमी गैरसोय कशी होईल

अलीकडे मात्र या कामगिरीचा अतिरेक होऊ लागल्याची शंका वारंवार येऊ लागली आहे. सध्या सुरू असलेल्या निवडणुकीच्या उत्सवात मोठ्या नेत्यांच्या जाहीर सभा व 'रोड शो'च्या निमित्ताने रस्ते, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था बंद करण्याचे प्रकार कमालीचे वाढले. सुरक्षेच्या दृष्टीने अतिमहत्त्वाच्या श्रेणीत येणाऱ्या नेत्याचा संबोधन कार्यक्रम असला की सामान्यांचे हाल ठरलेले आहेत. मग ते मुंबई, पुणे, नागपूर असो वा चंद्रपूर. परिस्थिती सर्वत्र सारखीच. इंदिरा गांधी तसेच राजीव गांधींच्या हत्येनंतर देशातील यंत्रणा नेत्यांच्या सुरक्षेविषयी अधिक दक्ष झाल्या; ते योग्यच. नेत्यांच्या जिवाला जपायलाच हवे. मात्र हे करताना सामान्यांना कमीत कमी त्रास होईल याकडे यंत्रणांनी लक्ष देणेसुद्धा तेवढेच गरजेचे. त्याकडे होत असलेल्या दुर्लक्षामुळे सध्या सामान्य नागरिक हैराण झालेले दिसतात. पंतप्रधान वा अतिमहत्त्वाच्या व्यक्तीची सभा असली की तीन किलोमीटरच्या



परिघातील वर्दळीची सारी ठिकाणे बंद केली जातात. हल्ली तर, नेत्यांचा 'रोड शो' असल्यास आदल्या रात्रीपासून रस्ते निर्मनुष्य केले जातात. वाहतूक वळवली जाते.

यामुळे होणाऱ्या कोंडीत हजारो लोक अडकून पडतात. 'शो' रस्त्यावर, पण 'मेट्रो बंद' हाही निर्णय ऐन वेळी घाईघाईने जाहीर केला जातो! यातून सामान्यजन, नोकरदार यांना भोगाव्या लागणाऱ्या हालअपेष्टांची दखल कोण घेणार? आपल्या रोडशोमुळे झालेल्या वाहतूककोंडीत अडकलेल्या रुग्णवाहिकेला वाट मोकळी करून दिली म्हणजे घेतली जनतेची काळजी असे या नेत्यांना वाटते काय? केवळ प्रसिद्धीसाठी दाखवलेल्या या औदार्यामुळे रुग्णांचा जीव वाचेल पण कोंडीत अडकलेल्या अनेकांचा श्वास गुदमरतो त्याचे काय? त्यांना वाऱ्यावर सोडायचे व आम्ही जनतेची काळजी करतो असे भाषणात सांगायचे हा दुट्टपीपणा नाही तर आणखी काय? दुर्दैव हे की भारतीय राजकारणात सक्रिय असलेला एकही नेता आपल्या आगमनामुळे लोकांना त्रास होणार नाही याची काळजी घ्या असे सुरक्षा यंत्रणांना सांगताना दिसत नाही. ही आत्ममग्नता लोकशाहीत योग्य कशी ठरू शकते? सुरक्षा यंत्रणेत थोडी जरी चूक झाली तरी त्याचा गवगवा करून राजकारण करणाऱ्या नेत्यांमुळेच हा बंदोबस्तातला अतिरेक अलीकडे वाढत चालला. अशा कार्यक्रमांसाठी सुरक्षा उपायांची आखणी करताना रस्ते व वाहतूक बंद करण्याचे अमर्याद अधिकार पोलिसांना आहेत. मात्र त्याची सूचना जनतेपर्यंत पोहचवावी असेही बंधन त्यात आहे. प्रत्यक्षात अलीकडे पोलीस समाजमाध्यमावर या सूचना जाहीर करून मोकळे होतात.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

**राज ठाकरे यांचा इशारा** मतदारयाद्यांमध्ये दुरुस्त्यांशिवाय निवडणुका नाही

# मतदारयाद्यांमध्ये 96 लाख बोगस मतदार

## निवडणुकांचा निकाल निश्चित झाला

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**केंद्र, राज्यानंतर सत्ताधाऱ्यांनी आता आपला मोर्चा जिल्हा परिषद, महापालिकांकडे वळविला असून या निवडणुकांचा निकाल निश्चित झाला आहे. त्यासाठी मुंबई, ठाणे, पुणे अशा शहरांमध्ये सुमारे ९६ लाख खोटे मतदार याद्यांमध्ये घुसविण्यात आले आहेत. त्यामुळे जोवर मतदार याद्या स्वच्छ होत नाहीत, आणि त्या सर्व पक्षांना मान्य होत नाहीत. तोवर राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाच होऊ देणार नाही, असा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी रविवारी दिला.**



राज्यात आगामी काळात होणाऱ्या महापालिका, जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मनसेच्या मुंबई महानगर प्रदेश मतदार यादी प्रमुखांचा मेळावा गोरेगाव येथील नेस्को सेंटरमध्ये पार पडला. या वेळी राज ठाकरे यांनी 'लाव रे तो व्हिडीओ'चा प्रयोग करीत केंद्र-राज्य सरकार व अदानी-अंबानींवर तीव्र हल्ला चढवला. सदोष मतदार याद्यावरून आम्ही निवडणूक आयोगाला जाब विचारल्यावर सत्ताधाऱ्यांना मिरच्या का झोंबतात. त्यांनी यावेळीही आखलेला डाव उधळला जाण्याच्या धास्तीमुळे सत्ताधाऱ्यांची चिडचिड होत असल्याचे सांगत ठाकरे यांनी विधानसभा निवडणुकीप्रमाणेच यावेळीही स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीसाठी ९६ लाख बोगस मतदार यादीत घुसविण्यात आल्याचा आरोप केला. विरोधकच नव्हे सत्ताधारी पक्षाचे आमदारही मतदार यांद्यामध्ये घोळ असल्याचे सांगत असून काहींनी तर २०-२० हजार मतदार बाहेरून आणल्याचे मान्य केले आहे. त्यामुळेच विधानसभा निवडणुकीत सत्ताधाऱ्यांना २३२ जागा मिळूनही राज्यात कुठेही विजयाचा जल्लोष झाला नाही असा टोलाही त्यांनी लगावला. आपण प्रगतीच्या आड येणारा माणूस नाही. पण मुंबई आणि महाराष्ट्रात होणारी प्रगती ही मराठी माणसाच्या थडग्यावर होणार असेल, तर खपवून घेणार नाही. तुम्हाला वाटत असेल हे रस्ते, अटल सेतू या सर्व योजना तुमच्यासाठी आहेत. पण या सर्व सोयी सुविधा उद्योगपतींनी जमिनी घेतल्या आहेत, त्याच्यासाठी असून जिथे नजर पडेल ते सर्व आपल्याला पाहिजे अशी भूमिका काही उद्योगपतींनी घेतली आहे. दुर्दैवाने त्यांना आपली मराठी माणसेच मदत करीत आहेत.' केंद्र आणि राज्यामध्ये सत्ता आहे आणि जिल्हा परिषदा, महापालिकाही हातात आल्या, तर रानच मोकळे होईल. हे सर्व सहज नाही, तर या निवडणुकीत सत्ताधाऱ्यांनी मोठा डाव आखल्याचा गंभीर आरोपही ठाकरे यांनी केला.असून त्यात दुरुस्त्या झाल्याशिवाय निवडणूका होऊ देणार नाही, असा इशाराही ठाकरे यांनी दिला आहे. राज्यातील विविध प्रकल्प, जमिनी अदानी, अंबानीच्या घशात घातल्या जात असून आता शहरेही त्यांना आंदण देण्याचा डाव आखला जात आहे. ठाणे जिल्ह्यावर कब्जा केल्याशिवाय मुंबईला हात लावता येत नाही, म्हणून बुलेट ट्रेन, वाढवण बंदर, विमानतळानंतर आता संजय गांधी उद्यानातील झाडे तोडून, तेथील आदिवासींना हटवून ही जागा अदानीला देण्याचा घाट घातला जात आहे.राज्यात आगामी काळात होणाऱ्या महापालिका, जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मनसेच्या मुंबई महानगर प्रदेश मतदार यादी प्रमुखांचा मेळावा गोरेगाव येथील नेस्को सेंटरमध्ये पार पडला. या वेळी राज ठाकरे यांनी 'लाव रे तो व्हिडिओ'चा प्रयोग करीत केंद्र-राज्य सरकार व अदानी-अंबानींवर तीव्र हल्ला चढवला. सदोष मतदार याद्यावरून आम्ही निवडणूक आयोगाला जाब विचारल्यावर सत्ताधाऱ्यांना मिरच्या का झोंबतात. त्यांनी यावेळीही आखलेला डाव उधळला जाण्याच्या धास्तीमुळे सत्ताधाऱ्यांची चिडचिड होत असल्याचे सांगत ठाकरे यांनी विधानसभा निवडणुकीप्रमाणेच यावेळीही स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीसाठी ९६ लाख बोगस मतदार यादीत घुसविण्यात आल्याचा आरोप केला.

### ९६ लाख खोटे मतदार

विरोधकच नव्हे सत्ताधारी पक्षाचे आमदारही मतदार यांद्यामध्ये घोळ असल्याचे सांगत असून काहींनी तर २०-२० हजार मतदार बाहेरून आणल्याचे मान्य केले आहे. त्यामुळेच विधानसभा निवडणुकीत सत्ताधाऱ्यांना २३२ जागा मिळूनही राज्यात कुठेही विजयाचा जल्लोष झाला नाही असा टोलाही त्यांनी लगावला. आपण प्रगतीच्या आड येणारा माणूस नाही. पण मुंबई आणि महाराष्ट्रात होणारी प्रगती ही मराठी माणसाच्या थडग्यावर होणार असेल

# नुकसानीने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड अस्वस्थता

## नवीन आव्हानांचा विचार संस्था नेहमीच करते : शरद पवार

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यात अतिवृष्टीने झालेल्या शेतीच्या नुकसानीमुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड अस्वस्थता आहे. नगर जिल्ह्याचाही त्यामध्ये समावेश आहे. मात्र या संकटावर मात करत पुढे जायला हवे, असा सल्ला राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी दिला आहे. केडगाव उपनगरातील रयत शिक्षण संस्थेच्या अंबिका विद्यालयाची नवीन इमारत उभारण्यात आली आहे.**

या इमारतीचे उद्घाटन खासदार शरद पवार यांच्या हस्ते आज, रविवारी करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. खासदार नीलेश लंके, आमदार अशुतोष काळे, संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, डॉ. पोपटराव पवार, माजी आमदार दादा कळमकर व राहुल जगताप, रयतचे सचिव विकास देशमुख, उपाध्यक्ष भगीरथ शिंदे, डॉ. अनिल पाटील. माजी महापौर अभिषेक कळमकर आदी उपस्थित होते. सध्या शिक्षण व तंत्रज्ञान क्षेत्रात आमूलाग्र बदल होत आहेत. या सर्वांचा स्वीकार करून रयत संस्थेचा कारभार यशस्वीपणे सुरू असल्याचे प्रतिपादन शरद पवार यांनी केले. ते म्हणाले की,



रयतच्या प्रत्येक शाखेत कृत्रिम बुद्धिमत्तेचे ज्ञान दिले जाते. शिक्षण क्षेत्रात जे नवीन बदल व तंत्रज्ञान येत आहेत त्यांचा स्वीकार करूनच संस्थेची वाटचाल सुरू आहे. नवीन आव्हानांचा विचार संस्था नेहमीच करते. त्यामुळेच नवीन पिढी घडवण्याचे काम या संस्थेच्या माध्यमातून केले जात आहे. कर्मवीर भाऊराव पाटलांनी गोरगरीब मुलांच्या शिक्षणाचे मिशन हाती घेत ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार केला. अहिल्यानगर जिल्ह्याने कर्मवीरांना मोलाची साथ दिल्यानेच 'रयत'चे मोठे जाळे जिल्ह्यात तयार झाले. स्व. शंकरराव काळे, रावसाहेब शिंदे आदी नेत्यांनी त्यात मोलाचे योगदान दिले, असेही त्यांनी सांगितले. यावेळी स्थानिक शालेय समितीचे किसन सातपुते, रावसाहेब सातपुते, गणेश सातपुते, महेश गुंड, रामदास येवले, माजी नगरसेवक सुनील कोतकर, मनोज कोतकर, प्रशांत कोतकर आदी उपस्थित होते. स्थेचे अध्यक्ष चंद्रकांत दळवी म्हणाले की, इंग्रजी शाळांसारखा दर्जा व शैक्षणिक सुविधा निर्माण करण्याचे काम संस्था करीत आहे. संस्था लवकरच नवीन संगणक प्रणाली विकसित करत असून लवकरच 'रयत'चा कारभार पेपरलेस होईल.

### तंत्रज्ञान क्षेत्रात आमूलाग्र बदल

त्यावेळी ते बोलत होते.खासदार नीलेश लंके, आमदार अशुतोष काळे, संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, डॉ. पोपटराव पवार, माजी आमदार दादा कळमकर व राहुल जगताप,अनिल पाटील. माजी महापौर अभिषेक कळमकर आदी उपस्थित होते. सध्या शिक्षण व तंत्रज्ञान क्षेत्रात आमूलाग्र बदल होत आहेत.

### ख्रिसमस - दिवाळीची तुलना

### अखिलेश यादव यांचे वादग्रस्त विधान; भाजपाकडून टीका

# मेणबत्त्यांवर इतका खर्च का?

**।मुंबई।**

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव, त्यांनी दिवाळीच्या तोंडावर केलेल्या एका विधानामुळे चर्चेत आले आहेत. लखनौमध्ये पत्रकारांशी बोलताना त्यांनी ख्रिसमस आणि दिवाळीची तुलना केली आणि दिवे व मेणबत्त्यांवर होणारा खर्च हा अपव्यय असल्याचे म्हटले. अखिलेश यादव यांच्या विधानावर राजकीय पक्षांनी प्रतिक्रिया व्यक्त केल्या असून, भाजपाने त्यावर जोरदार टीका केली आहे.**

## मेणबत्त्यांवर होणारा खर्च हा अपव्यय



लखनौ येथील पक्ष कार्यालयात पत्रकारांशी बोलताना अखिलेश यादव म्हणाले, “मी भगवान रामाच्या नावाने एक सूचना देऊ इच्छितो. पहा, जगभरात नाताळचा काळ असतो. तेव्हा संपूर्ण शहरे लाइट्सनी उजळलेली असतात आणि ती महिनोनमहिने तशीच राहतात. त्यांच्याकडून शिका. दिवाळीत दिवे आणि मेणबत्त्यांवर इतका खर्च का करायचा? या सरकारकडून तुम्ही काय अपेक्षा करू शकता? हे सरकार उलथवून टाका. आमचे सरकार आल्यास आम्ही सुंदर रोषणाई करू.”यावेळी उत्तर प्रदेशातील वीजपुरवठा खंडित होणे, वाहतूक कोंडी होणे आणि नागरी सुविधांचा अभाव यासाठी अखिलेश यांनी राज्य सरकारला जबाबदार धरले. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या बिहार दौऱ्यावरही त्यांनी टीका केली आणि त्यांना “स्टार-स्प्लिटिंग एजंट” असे म्हटले. बिहारमधील लोक कधीही जातीय विचारसरणी स्वीकारणार नाहीत, असे ते म्हणाले.भाजपाचे प्रवक्ते शहजाद पूनावाला म्हणाले की, समाजवादी पक्षाचा इतिहास हिंदूविरोधी आहे.

राम मंदिर आंदोलनादरम्यानही या पक्षाने विरोध केला होता. शहजाद यांनी आरोप केला की, हाच पक्ष आता दिवे लावण्यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहे. ते म्हणाले की, सैफईमध्ये भव्य उत्सव होतात, परंतु जेव्हा अयोध्येत प्रकाशोत्सव साजरा केला जातो, तेव्हा प्रश्न उपस्थित होतात. भाजपचे नेते संजय राय यांनी अखिलेश यादव यांच्या विधानाचा तीव्र निषेध केला. सोशल मीडिया पोस्टमध्ये त्यांनी म्हटले आहे की, “अखिलेश यादव यांना दिवाळीत दिव्यांपासून त्रास आहे, पण त्यांना ख्रिसमस आवडतो. दिव्यांच्या विक्रीमुळे प्रजापती समाज आणि शेतकऱ्यांना रोजगार मिळतो. अखिलेश यादव आता म्हणत आहेत की हिंदूंनी दिवाळीत दिवे लावू नयेत. जनता लवकरच अशा हिंदूविरोधी व्यक्तीला त्यांच्या मताच्या बळावर धडा शिकवेल.”

## शेतकऱ्यांना रोजगार मिळतो

ते म्हणाले की, सैफईमध्ये भव्य उत्सव होतात, परंतु जेव्हा अयोध्येत प्रकाशोत्सव साजरा केला जातो, तेव्हा प्रश्न उपस्थित होतात.भाजपाचे नेते संजय राय यांनी अखिलेश यादव यांच्या विधानाचा तीव्र निषेध केला. सोशल मीडिया पोस्टमध्ये त्यांनी म्हटले आहे की, “अखिलेश यादव यांना दिवाळीत दिव्यांपासून त्रास आहे, पण त्यांना ख्रिसमस आवडतो. दिव्यांच्या विक्रीमुळे प्रजापती समाज आणि शेतकऱ्यांना रोजगार मिळतो.

लखनौ येथील पक्ष कार्यालयात पत्रकारांशी बोलताना अखिलेश यादव म्हणाले, “मी भगवान रामाच्या नावाने एक सूचना देऊ इच्छितो. पहा, जगभरात नाताळचा काळ असतो. तेव्हा संपूर्ण शहरे लाइट्सनी उजळलेली असतात आणि ती महिनोनमहिने तशीच राहतात. त्यांच्याकडून शिका. दिवाळीत दिवे आणि मेणबत्त्यांवर इतका खर्च का करायचा? या सरकारकडून तुम्ही काय अपेक्षा करू शकता? हे सरकार उलथवून टाका. आमचे सरकार आल्यास आम्ही सुंदर रोषणाई करू.”यावेळी उत्तर प्रदेशातील वीजपुरवठा खंडित होणे, वाहतूक कोंडी होणे आणि नागरी सुविधांचा अभाव यासाठी अखिलेश यांनी राज्य सरकारला जबाबदार धरले. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या बिहार दौऱ्यावरही त्यांनी टीका केली आणि त्यांना “स्टार-स्प्लिटिंग एजंट” असे म्हटले. बिहारमधील लोक कधीही जातीय विचारसरणी स्वीकारणार नाहीत, असे ते म्हणाले.भाजपाचे प्रवक्ते शहजाद पूनावाला म्हणाले की, समाजवादी पक्षाचा इतिहास हिंदूविरोधी आहे. राम मंदिर आंदोलनादरम्यानही या पक्षाने विरोध केला होता. शहजाद यांनी आरोप केला की, हाच पक्ष आता दिवे लावण्यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहे.

# नाकारल्याने इच्छुकाने फाडले स्वतःचेच कपडे

## लालू प्रसाद यादव यांच्या घरासमोर लोळून लोळून रडले मदन शाह

**।मुंबई।**

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**राष्ट्रीय जनता दलाचे प्रमुख लालू प्रसाद यादव यांच्या निवासस्थानाबाहेर आज एक नाट्यमय दृश्य पाहायला मिळाले. राजदचे ज्येष्ठ नेते आणि मधुबन विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असलेले मदन शाह यांना पक्षाने तिकीट नाकारले. यानंतर त्यांचा भावनिक उद्रेक पाहायला मिळाला.**

तिकीट नाकारल्यामुळे निराश झालेल्या मदन शाह यांनी स्वतःचा कुर्ता फाडला आणि लालू प्रसाद यादव यांच्या घरासमोरच रस्त्यावर लोळून मोठ्याने रडले. या प्रकारामुळे लालू प्रसाद यांच्या निवासस्थानाबाहेर गोंधळ उडाला. दरम्यान, ही घटना व्हिडिओमध्ये कैद झाली असून सोशल मीडियावर ती मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. मदन शाह यांनी आरोप केला आहे की, त्यांनी तिकिटासाठी पैसे देण्यास नकार दिल्याने त्यांना उमेदवारी नाकारण्यात आली. थेट आरोप करताना त्यांनी राज्यसभा खासदार संजय यादव यांचे नाव घेतले. “पक्षाने माझ्यासारख्या प्रामाणिक आणि कष्टाळू कार्यकर्त्यांकडे दुर्लक्ष केले आहे. ते आता पैसे




देणाऱ्यांना प्राधान्य देत आहेत,” असे मदन शाह रडत रडत म्हणाले. दुसऱ्या एका व्हिडिओमध्ये मदन शाह, लालू प्रसाद यादव यांच्या पाटण्यातील निवासस्थानाबाहेर जाऊन त्यांच्या गाडीचा पाठलाग करण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत. अखेर सुरक्षा कर्मचाऱ्यांना हस्तक्षेप करावा लागला आणि त्यांनी शाह यांना परिसरातून हटवले.“२०२० मध्ये, लालूंनी मला रांचीला बोलावले आणि तेली समाजाच्या लोकसंख्येबाबत एक सर्वेक्षण केले. त्यांनी सांगितले की, मदन शाह मधुबन मतदारसंघातून रणधीर सिंग यांना पराभूत करतील. तेजस्वी आणि लालूंनी मला फोन केला होता, त्यांनी सांगितले होते की ते मला तिकीट देतील. मी ९०च्या दशकापासून पक्षासाठी काम करत आहे. यासाठी मी माझी जमीन विकली आहे,” असेही ते म्हणाले.

## कष्टाळू कार्यकर्त्यांकडे दुर्लक्ष

मदन शाह यांनी आरोप केला आहे की, त्यांनी तिकिटासाठी पैसे देण्यास नकार दिल्याने त्यांना उमेदवारी नाकारण्यात आली. थेट आरोप करताना त्यांनी राज्यसभा खासदार संजय यादव यांचे नाव घेतले. “पक्षाने माझ्यासारख्या प्रामाणिक आणि कष्टाळू कार्यकर्त्यांकडे दुर्लक्ष केले आहे.

तिकीट नाकारल्यामुळे निराश झालेल्या मदन शाह यांनी स्वतःचा कुर्ता फाडला आणि लालू प्रसाद यादव यांच्या घरासमोरच रस्त्यावर लोळून मोठ्याने रडले. या प्रकारामुळे लालू प्रसाद यांच्या निवासस्थानाबाहेर गोंधळ उडाला. दरम्यान, ही घटना व्हिडिओमध्ये कैद झाली असून सोशल मीडियावर ती मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

# शाहरुख खान करतो घरातली कामं

आजपर्यंत शाहरुख खानने अनेक हिट सिनेमे केले. रोमँटिक, ॲक्शन आणि कॉमेडी सर्व प्रकारच्या सिनेमांमध्ये त्याने महत्त्वाच्या भूमिका केल्या. २०१८ च्या 'झिरो' चित्रपटानंतर शाहरुख खान बराच काळ चित्रपटांपासून दूर राहिला आणि चार वर्षे पूर्ण केल्यानंतर तो २०२३ मध्ये 'पठाण' चित्रपटात दिसला. यानंतर त्याचा 'जवान' चित्रपट प्रदर्शित झाला आणि तोही ब्लॉकबस्टर ठरला आणि त्यानंतर तो 'डंकी'मध्येही दिसला. आता शाहरुख पुन्हा एकदा चित्रपटांमध्ये ॲक्टिव्ह झाला आहे, पण जेव्हा तो ब्रेकवर होता तेव्हाही तो 'आस्क मी एनीथिंग' सेशनद्वारे त्याच्या चाहत्यांशी संपर्क साधत होता.शाहरुख खानने स्वतःबद्दल सांगितले की, जेव्हा तो शूटिंग करत नसतो तेव्हा तो काहीही करत नाही. अलीकडेच किंग खान १ मे रोजी मुंबईत झालेल्या 'वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेनमेंट समिट'च्या उद्घाटन समारंभाला उपस्थित होता.

# अबीर गुलालवरील बंदीनंतर, वाणी कपूर सावध

काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी मोठा दहशतवादी हल्ला झाला. यानंतर दहशतवाद्यांविरोधात देशभरातून तीव्र निषेध करण्यात आला. अनेक कलाकारांनीही सोशल मीडियामार्फत पोस्ट करीत त्यांच्या भावना व्यक्त केल्या; तर हल्ला झाल्यानंतर सरकारने काही महत्त्वाचे निर्णय घेतले. पाकिस्तानचे सोशल मीडिया अकाउंट भारतात बॅन करण्यात आले, तर काही दिवसांपूर्वीच काश्मीरमध्ये हल्ला झाल्यानंतर पाकिस्तानी कलाकार सहभागी असलेल्या कलाकृतींवर बंदी आणली. यासह काही दिवसांनंतर आता पाकिस्तानी कलाकारांचेही सोशल मीडिया अकाउंट भारतात बॅन केले आहेत. गेल्या काही दिवसांत पाकिस्तानी अभिनेता फवाद खान मुख्य भूमिकेत असलेल्या 'अबीर गुलाल' या चित्रपटाची बरीच चर्चा झाली होती. हा चित्रपट ९ मे रोजी प्रदर्शित होणार होता. परंतु, काश्मीरमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर या चित्रपटाला बॅन करण्यात आलं आहे.यामध्ये फवाद खानसह अभिनेत्री वाणी कपूरही मुख्य भूमिकेत होती. पण, चित्रपटाला बॅन करण्यात आल्याने आता वाणी कपूरने तिच्या सोशल मीडिया अकाउंटवरून 'अबीर गुलाल' चित्रपटाच्या संदर्भातील सर्व फोटो व्हिडीओ डिलीट केले आहेत.'अबीर गुलाल' चित्रपटातून फवाद खान तब्बल नऊ वर्षांनी बॉलीवूडमध्ये पुनरागमन करणार होता; तर शेवटचा तो 'ए दिल है मुश्कील' या चित्रपटात झळकला होता.





# अमिषा-बिपाशात 36 चा आकडा

बॉलीवूडमध्ये 'कॅटफाईट्स'चे एक-दोन नव्हे तर अनेक किस्से आहेत. बबिता-नीतू कपूर, ऐश्वर्या राय-राणी मुखर्जी, प्रियांका चोप्रा-करीना कपूर, दीपिका पदुकोण-कतरिना कैफ, कंगना रणौत-तापसी पन्नू आणि स्वरा भास्कर अशी अनेक नावे आहेत. यापैकी एक नाव अमिषा पटेल आणि बिपाशा बासू यांचेही आहे. दोघांमध्ये ३६ चा आकडा आहे. करण जोहरच्या 'कॉफी विथ करण' या कार्यक्रमात दोघांनीही एकमेकांवर टीका केली होती.'फिल्मी मंत्रा'ला दिलेल्या मुलाखतीत अमिषा पटेलने स्पष्ट केले की तिने कधीही कोणाशीही भांडण केले नाही. हे प्रकरण बिपाशा बासूच्या 'जिस्म' या चित्रपटाशी संबंधित आहे. बॉलीवूडमधील भांडणं 'कॉफी विथ करण' या लोकप्रिय चॅट शोशी जोडलेले आहे. या शोमध्ये सहभागी होताना बिपाशा बासू आणि अमिषा पटेल यांनी एकमेकांबद्दल अशा कमेंट केल्या की त्या एकमेकांच्या कट्टर शत्रू बनल्या. आता 'गदर' अभिनेत्री म्हणते की त्यांच्यात असे काहीही नाही. तिने या गोष्टींना केवळ अफवा म्हटलं आहे.'कॉफी विथ करण'च्या एका भागात बिपाशा बासूने केलेल्या बॉडी-शेमिंगबद्दल विचारले असता, अमिषा म्हणाली, "मी कधीही त्यावर प्रतिक्रिया दिली नाही.

# 'त्या' वक्तव्यामुळे सोनू निगम अडचणीत

बॉलीवूडच्या काही प्रसिद्ध गायकांपैकी एक म्हणजे सोनू निगम. सोनू निगमने आजवर आपल्या सुमधुर आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध केलं आहे. त्याच्या आवजाचे आज केवळ देशभरातच नव्हे तर जगभरात लाखों चाहते आहेत. आपल्या गाण्यांमुळे कायमच चर्चेत असणारा सोनू निगम त्याच्या एका वक्तव्यामुळे अडचणीत सापडला आहे. नुकत्याच झालेल्या कॉन्सर्टमध्ये एका चाहत्याने गायकाकडे कन्नड गाण्याची मागणी केली असता सोनू निगमने त्याच्या वागण्याची तुलना थेट पहलगाम हल्ल्याशी केली आणि यामुळेच सोनू निगमविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली आहे. सोनू निगमच्या नुकत्याच झालेल्या कॉन्सर्टमध्ये तो हिंदी गाणं गात असताना एका विद्यार्थ्याने 'कन्नड कन्नड' ओरडत कन्नडमध्ये गाणं गाण्याची मागणी केली. यावर सोनूने मध्येच गाणे थांबवले आणि म्हटले की, "मी माझ्या कारकिर्दीत अनेक भाषांमध्ये गाणी गायली आहेत, परंतु मी गायलेली सर्वोत्तम गाणी कन्नडमध्ये आहेत. मी जेव्हा जेव्हा तुमच्या शहरात येतो, तेव्हा मला खूप प्रेम आणि आदर मिळतो. तुम्ही माझ्यावर कुटुंबीयांसारखे प्रेम केले आहे. पण जेव्हा माझ्या कारकिर्दीइतकंही वय नसलेलं मुलं येऊन असं वागतं तेव्हा ते वाईट वाटते." यापुढे त्याने "यामुळेच पहलगामसारख्या घटना घडतात" असंही म्हटलं. सोनू निगमने चाहत्याने त्याच्याकडे जी मागणी केली होती, त्याची तुलना थेट पहलगाम हल्ल्याशी केल्याने काही संघटनांनी गायकाच्या असंवेदनशील वागण्याबद्दल आक्षेप घेतला आहे. यामुळेच कर्नाटक रक्षण वेदिके (केआरव्ही) या प्रमुख कन्नड संघटनेने बेंगळुरूमध्ये पोलिसांत सोनू निगम विरोधात तक्रार दाखल केली.

# कतरिना 'त्या' व्हिडीओमुळे होतेय ट्रोल



बॉलीवूड अभिनेत्री कतरिना कैफ सध्या लाइमलाइटपासून दूर राहण्याचा प्रयत्न करत आहे. काल रात्री कतरिना झोया अख्तरच्या घरी गेली होती. जेव्हा कतरिना कैफ येथून मेकअपशिवाय बाहेर पडताना दिसली, तेव्हा सर्वांच्या नजरा तिच्यावर खिळल्या होत्या. कतरिना ओव्हरसाईज आऊटफिटमध्ये दिसली आणि तिच्यासोबत 'बार बार देखो' चित्रपटाची दिग्दर्शिका नित्या मेहरादेखील होती. खरंतर, झोयाच्या घरी झालेल्या एका पार्टीत कतरिनाची पहिली भेट विकी कौशलशी झाली होती, असे सांगितले जाते. काही वेळातच ते बॉलीवूडमधील सर्वात आवडत्या जोडप्यांपैकी एक बनले. त्यांनी त्यांचे नाते अनेक वर्षे लपवून ठेवले. कतरिना झोयाच्या घरी का गेली होती हे माहीत नाही. या नव्या लूकमुळे कतरिना सोशल मीडियावर नेटकऱ्यांकडून ट्रोल झाली आहे. कतरिनाला पाहून लोकांना ऐश्वर्या रायची आठवण येऊ लागली.कतरिनाची झलक पाहून लोकांनी कमेंट करायला सुरुवात केली आहे. एकाने म्हटले, 'तू आजारी आहेस का? मेकअपशिवाय अशी का फिरते, तीच बोरिंग हेयरस्टाईल, बोरिंग ड्रेस.' तर एकाने लिहिले, 'कतरिना आता संस्कारी झाली आहे आणि नेहमीप्रमाणे काहींनी पुन्हा विचारले, कतरिना गर्भवती आहे का?' दुसऱ्याने म्हटले, 'ही ऐश्वर्या रायसारखी होत आहे.' लग्नाआधी विकी आणि कतरिना यांनी त्यांच्या नात्याबद्दल कोणाला कळूदेखील दिलं नाही. ९ डिसेंबर २०२१ मध्ये शाही थाटात विकी कौशल आणि कतरिना कैफ यांनी लग्न केलं. दोघांच्या लग्नाचे फोटो आणि व्हिडीओदेखील सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले होते.विकी कौशलने पिंकव्हिलाला दिलेल्या मुलाखतीत सांगितले होते की, त्यांची पहिली ऑफिशिअल भेट २०१९ मध्ये झालेल्या स्क्रीन अवॉर्ड्समध्ये झाली होती. तो म्हणाला होता, "तर मी होस्ट करत होतो, मी तिला पहिल्यांदाच भेटलो आणि तिच्याशी बोललो, ती खूप गोड दिसत होती."कतरिना कैफच्या कामाबद्दल बोलायचं झाल्यास ती शेवटची 'मेरी ख्रिसमस' या तमिळ चित्रपटात दिसली होती. त्याआधी बॉलीवूडच्या 'टायगर ३'मध्ये कतरिनाचा अभिनय पाहायला मिळाला होता. बॉलीवूड अभिनेत्री कतरिना कैफ सध्या लाइमलाइटपासून दूर राहण्याचा प्रयत्न करत आहे. काल रात्री कतरिना झोया अख्तरच्या घरी गेली होती. जेव्हा कतरिना कैफ येथून मेकअपशिवाय बाहेर पडताना दिसली, तेव्हा सर्वांच्या नजरा तिच्यावर खिळल्या होत्या. कतरिना ओव्हरसाईज आऊटफिटमध्ये दिसली आणि तिच्यासोबत 'बार बार देखो' चित्रपटाची दिग्दर्शिका नित्या मेहरादेखील होती. खरंतर, झोयाच्या घरी झालेल्या एका पार्टीत कतरिनाची पहिली भेट विकी कौशलशी झाली होती, असे सांगितले जाते. काही वेळातच ते बॉलीवूडमधील सर्वात आवडत्या जोडप्यांपैकी एक बनले. त्यांनी त्यांचे नाते अनेक वर्षे लपवून ठेवले. कतरिना झोयाच्या घरी का गेली होती हे माहीत नाही. या नव्या लूकमुळे कतरिना सोशल मीडियावर नेटकऱ्यांकडून ट्रोल झाली आहे. कतरिनाला पाहून लोकांना ऐश्वर्या रायची आठवण येऊ लागली.

**अनोखा विक्रम नावे केला**

## अशी कामगिरी करणारी पहिला महिला फलंदाज

# हरमनप्रीतने घडवला इतिहास!

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारताच्या महिला संघाची कर्णधार हरमनप्रीकत कौरने महिला क्रिकेट जगतात नाव विक्रम आपल्या नावे केला आहे. इंग्लंडविरूद्ध झालेल्या सामन्यात कर्णधार हरमनने संघाला गरज असताना महत्त्वपूर्ण खेळी केली आणि स्मृती मानधनासह संघाचा डाव सावरला. पण संघ मात्र विजयी रेषा गाठण्यात अपयशी ठरला. हरमनने ७० धावांच्या उत्कृष्ट खेळीच्या जोरावर अनोखा विक्रम आपल्या नावे केला आहे.**

## संघ विजय मिळवण्यात अपयशी ठरला




भारत मोठ्या अडचणीत असताना हरमन फलंदाजीला आली आणि तिला संघाचा डाव उचलून धरला. १० षटकांत २बाद ४२ धावा अशी स्थिती असताना हरमनप्रीत फलंदाजीला उतरली. २८८ धावांच्या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करत असताना तिची खेळीच भारतासाठी आशेचा किरण ठरली. दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलियाविरुद्ध मागील दोन सामने गमावल्यामुळे, उपांत्य फेरीत स्थान टिकवण्यासाठी हा सामना जिंकणं भारतासाठी अत्यावश्यक होतं आणि हार्दमनप्रीतची ही खेळी त्या लढतीचं केंद्रबिंदू ठरली. पण अखेरीस निकाल मात्र संघाच्या बाजूने लागला नाही.हरमनप्रीत कौरने महिला विश्वचषकाच्या इतिहासात आपल्या नावाचा दबदबा निर्माण केला. तिने स्पर्धेत चौथ्या आणि त्यापेक्षा खालच्या क्रमांकावर फलंदाजी करत १ हजार धावांचा टप्पा पार केला आणि अशी कामगिरी करणाऱ्या ती मोजक्या खेळाडूंपैकी एक बनली.आपल्या कारकिर्दीत पाचव्यांदा विश्वचषक खेळताना, हरमनप्रीतने आतापर्यंत ३१ सामने खेळले असून १०१७ धावा केल्या आहेत.तसेच तिने ३ शतकं आणि ५ अर्धशतकं झळकावली आहेत. हरमनप्रीत कौर महिला विश्वचषकात चौथ्या आणि त्याच्यापेक्षा खालच्या क्रमांकावर फलंदाजी करणाऱ्या फलंदाजांमध्ये एक हजार धावांचा पल्ला गाठणारी पहिली महिला फलंदाज ठरली आहे. याशिवाय महिला विश्वचषकामध्ये १ हजार धावा पूर्ण करणारी ती दुसरी भारतीय महिला फलंदाज ठरली आहे.हरमनप्रीत कौरने विश्वचषक इतिहासात ८ अर्धशतकी खेळी केल्या आहेत. यासह ती विश्वचषकाच्या इतिहासातील सर्वाधिक ५० किंवा त्याहून अधिक धावा करणारी खेळाडू ठरली आहे. विशेषत: तिसऱ्या किंवा त्यापेक्षा खालच्या क्रमांकावर फलंदाजी करताना हरमनने हा विक्रम आपल्या नावे केला आहे. पूर्वी या यादीत हरमनप्रीत नॅट स्किव्हर-ब्रंट आणि मिताली राज यांच्याबरोबरीत होती, पण आता तिने त्यांनाही मागे टाकलं

## १ हजार धावांचा टप्पा पार केला

आहे.हरमनप्रीत कौरने विश्वचषक इतिहासात ८ अर्धशतकी खेळी केल्या आहेत. यासह ती विश्वचषकाच्या इतिहासातील सर्वाधिक ५० किंवा त्याहून अधिक धावा करणारी खेळाडू ठरली आहे. विशेषत: तिसऱ्या किंवा त्यापेक्षा खालच्या क्रमांकावर फलंदाजी करताना हरमनने हा विक्रम आपल्या नावे केला आहे. पूर्वी या यादीत हरमनप्रीत नॅट स्किव्हर-ब्रंट आणि मिताली राज यांच्याबरोबरीत होती, पण आता तिने त्यांनाही मागे टाकलं आहे.

आहे.भारत मोठ्या अडचणीत असताना हरमन फलंदाजीला आली आणि तिला संघाचा डाव उचलून धरला. १० षटकांत २बाद ४२ धावा अशी स्थिती असताना हरमनप्रीत फलंदाजीला उतरली. २८८ धावांच्या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करत असताना तिची खेळीच भारतासाठी आशेचा किरण ठरली. दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलियाविरुद्ध मागील दोन सामने गमावल्यामुळे, उपांत्य फेरीत स्थान टिकवण्यासाठी हा सामना जिंकणं भारतासाठी अत्यावश्यक होतं आणि हार्दमनप्रीतची ही खेळी त्या लढतीचं केंद्रबिंदू ठरली. पण अखेरीस निकाल मात्र संघाच्या बाजूने लागला नाही.हरमनप्रीत कौरने महिला विश्वचषकाच्या इतिहासात आपल्या नावाचा दबदबा निर्माण केला. तिने स्पर्धेत चौथ्या आणि त्यापेक्षा खालच्या क्रमांकावर फलंदाजी करत १ हजार धावांचा टप्पा पार केला आणि अशी कामगिरी करणाऱ्या ती मोजक्या खेळाडूंपैकी एक बनली.आपल्या कारकिर्दीत पाचव्यांदा विश्वचषक खेळताना, हरमनप्रीतने आतापर्यंत ३१ सामने खेळले असून १०१७ धावा केल्या आहेत. तिची सरासरी ४६.२२ अशी प्रभावी आहे, तसेच तिने ३ शतकं आणि ५ अर्धशतकं झळकावली आहेत. हरमनप्रीत कौर महिला विश्वचषकात चौथ्या आणि त्याच्यापेक्षा खालच्या क्रमांकावर फलंदाजी करणाऱ्या फलंदाजांमध्ये एक हजार धावांचा पल्ला गाठणारी पहिली महिला फलंदाज ठरली आहे. याशिवाय महिला विश्वचषकामध्ये १ हजार धावा पूर्ण करणारी ती दुसरी भारतीय महिला फलंदाज ठरली

# भारताच्या जबड्यातून इंग्लंडने हिसकावला विजय

## इंग्लिश संघाची सेमीफायनलमध्ये धडक, स्मृती-हरमनची खेळी व्यर्थ

।नवी दिल्ली।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय महिला संघाला वनडे वर्ल्डकप २०२५ मध्ये सलग तिसऱ्या पराभवाला सामोरं जावं लागलं आहे. इंग्लंड महिला संघाने भारताच्या जबड्यातून विजय हिसकावून घेत अवघ्या ४ धावांनी पराभव केला.**




भारतीय संघाविरूद्धच्या विजयानंतर इंग्लंड संघ महिला वनडे विश्वचषक २०२५ च्या सेमीफायनमध्ये प्रवेश करणारा तिसरा संघ ठरला आहे. भारताकडून स्मृती मानधना आणि हरमनप्रीत कौर यांनी शतकी भागीदारी रचत संघाचा डाव सावरला होता, पण संघाला विजयापर्यंत नेण्यात मात्र अपयशी ठरले. भारतानेही इंग्लंड संघाप्रमाणेच अखेरच्या षटकांमध्ये विकेट्स गमावले. त्यामुळे अखेरच्या षटकात भारताला विजयासाठी १४ धावांची गरज होती. पहिल्या तीन चेंडूत भारताने फक्त ३ धावा केल्या. तर चौथ्या चेंडूवर एकही धाव घेता आली नाही. अखेरच्या चेंडू चौकारासाठी गेला खरा पण तोपर्यंत सामना हातातून निसटला होता आणि परिणामी

## ब्यूमाँट -जॉन्सनी चांगली सुरूवात

भारताच्या फलंदाजांनी उत्कृष्ट कामगिरी करूनही अखेर भारताला सामन्यात पराभव पत्करावा लागला. इंग्लंडकडून एलिस कॅप्सी वगळता सर्व गोलंदाजांनी विकेट्स घेतल्या. इंग्लंडने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला आणि ५० षटकांत ८ बाद २८८ धावा केल्या. इंग्लंडकडू टॅमी ब्यूमाँट आणि एमी जॉन्स यांनी चांगली सुरूवात केली.

भारतीय संघावर इंग्लंडने ४ धावांनी विजय मिळवला.इंग्लंडने दिलेल्या २८८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना प्रतिका रावल सुरूवातीलाच बाद झाली. यानंतर हरलीन देओलने काही कमालीचे फटके खेळले. पण हरलीनदेखील लवकर बाद झाली. यानंतर कर्णधार स्मृती मानधना आणि उपकर्णधार हरमनप्रीत कौरने उत्कृष्ट शतकी भागीदारी रचली. भारताकडून स्मृती मानधनाने ९४ चेंडूत ८ चौकारांसह ८८ धावांची शानदार खेळी केली. तर कर्णधार हरमनप्रीत कौरने ७० चेंडूत १० चौकारांसह ७० धावांची खेळी केली. याशिवाय दीप्ती शर्मानेही अर्धशतक झळकावलं.

स्मार्ट PCMC
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। सोमवार।
। दि. 20 ऑक्टोबर 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

### भाजपा युवा मोर्चा शहराध्यक्ष दिनेश यादव यांचा विधायक उपक्रम

# दिवाळीनिमित्त स्वच्छता-आरोग्य कर्मचाऱ्यांप्रति कृतज्ञता!

## महापालिका प्रशासनाच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट



। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**दिवाळी म्हणजे प्रकाशाचा, आनंदाचा आणि आपुलकीचा सण. याच सणाच्या पार्श्वभूमीवर कुदळवाडी येथे एक आगळावेगळा उपक्रम राबवण्यात आला. आरोग्य, सफाई आणि ड्रेनेज विभागातील कर्मचाऱ्यांचा सन्मान करून त्यांच्या समाजासाठी केलेल्या अमूल्य योगदानाची दखल घेण्यात आली.**

या सन्मान सोहळ्याचे आयोजन भाजपा युवा मोर्चा शहराध्यक्ष दिनेश यादव आणि इंद्रायणी महिला प्रतिष्ठान अध्यक्ष निशा यादव यांनी केले. कार्यक्रमात सर्व कर्मचाऱ्यांना मिठाई आणि भेटवस्तू प्रदान करून त्यांच्या निष्ठेचे, मेहनतीचे व सेवेचे मनापासून कौतुक करण्यात आले.

कार्यक्रमात संरपंच काळुराम यादव, चेअरमन दत्तात्रय मोरे, तात्यासाहेब सपकाळ, किसन आप्पा यादव, कोडिंबा यादव, मुरलीधर पवार, लालचंद यादव, विलास यादव, दिपक ठाकुर, अमित बालघरे, काका शेळके, विलास घुले, सुरेश वाळुंज, दिपक घन, प्रकाश चौधरी, स्वराज पिजंण, राजेश घुले, मेघा यादव आदी उपस्थित होते.

हा कार्यक्रम म्हणजे केवळ सन्मानाचा नव्हे, तर एक सामाजिक जाणीवेचा आणि सेवाभावाचा उत्सव ठरला. गावकऱ्यांच्या वतीने कर्मचाऱ्यांना दिलेला हा आदरपूर्वक सन्मान समाजात सकारात्मकतेचे आणि ऐक्याचे भाव नक्कीच वाढवणारी ठरली. या मान्यवरांनी कर्मचाऱ्यांशी थेट संवाद साधून त्यांचे कार्य गौरवले आणि दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

> "ही दिवाळी फक्त प्रकाशाची नाही, तर आपल्यासाठी झटणाऱ्या हातांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी आहे. या कर्मचाऱ्यांमुळेच आपला परिसर स्वच्छ आणि आरोग्यदायी राहतो. त्यांना एक छोटीशी भेट देऊन मोठ्या सेवेचे स्मरण करून देणे, हाच आमचा उद्देश होता. हा उपक्रम दरवर्षी अधिक व्यापक स्वरूपात राबवणार आहोत. त्यांच्या एकत्रित प्रयत्नांनी कुदळवाडी अधिक स्वच्छ, निरोगी आणि सुंदर होत आहे.
> **-दिनेश यादव,** शहराध्यक्ष, युवा मोर्चा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# दीपोत्सवात क्रांतितीर्थ उजळले

## चापेकर बंधूंच्या वाड्यात दिव्यांच्या प्रकाशात न्हाऊन निघाला

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**दीपावलीचे औचित्य साधून धनत्रयोदशी निमित्त चिंचवडगावातील क्रांतितीर्थ अर्थात क्रांतिवीर चापेकर बंधूंच्या वाड्यात दीपोत्सव साजरा करण्यात आला.**

क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीचे अध्यक्ष पद्मश्री गिरीश प्रभुणे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा संघचालक विनोद बन्सल, विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा अध्यक्ष ॲड. ललित झुनझुनवाला, सौ. झुनझुनवाला, क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीचे उपाध्यक्ष डॉ. अशोक नगरकर, शिक्षण विभाग प्रमुख नितीन बारणे, मधुसूदन जाधव, सुहास पोफळे, हेमराम चौधरी, डॉ. शकुंतला बन्सल या मान्यवरांनी प्रज्वलित केलेल्या दीपांनी तसेच विद्युत रोषणाईने संपूर्ण वास्तू उजळून निघाली होती. याप्रसंगी सुगंधी चाफ्याची फुले आणि मिष्टान्नाचे वितरण करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या संयोजनात निखिल परदेशी, अतुल आडे, समर्थ डोंगरे, हर्षदा धुमाळ, सागर शेवाळे, यज्ञेश दराडे, नितीश कलापुरे, किरण गायकवाड, रमा गायकवाड यांनी सहकार्य केले.



www.rklgis.org

RKL GALAXY International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution

RKL Galaxy International School

EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING

# Admission Open

## FOR 2026 – 27

## Nursery – Std X

- **CBSE** Curriculum
- **Separate Sports Teachers** for Indoor & Outdoor Sports
- Digital Classrooms with **AV Facilities**
- **Skill Development Programs** including:
  Robotics
  Dance, Music, Speech & Drama
  Entrepreneurship
- Focus on **Holistic Development**



**Enroll Now!**

Sunday Open: From 10 AM to 1 PM

**Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!**

8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune

www.rklgis.org

RKL GALAXY International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution

RKL Galaxy International School

EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING

# ADMISSION OPEN FOR THE YEAR 2026-27

NURSERY - STD X

What we Offer?

- CBSE Curriculum
- Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
- Digital Classrooms with AV Facilities
- Skill Development Programs:
  Robotics
  Dance, Music, Speech & Drama
  Entrepreneurship
- Focus on Holistic Development

Enroll Now!



Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!

8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune

### खंडोबा गडावर जयाद्री सखिंची दिवाळी

# पारंपरिक उत्साहात ‘हरिद्रोत्सव’ साजरा!

## यंदाही जयाद्री सखी कन्या परिवाराने लावली हजेरी

। जेजुरी ।
विजयकुमार हरिश्चंद्रे :महाईन्यूज

**“एक पणती लावू सखे, अंधार सारा घालवू...” या मंगल वातावरणात खंडोबाच्या गडावर दिवाळीचा पारंपरिक सोहळा मोठ्या भक्तिभावाने पार पडला. अठरा पगड जाती-धर्मांची कुलदैवत मानल्या जाणाऱ्या श्री खंडोबा-म्हाळसा देवतेच्या दिवाळी उत्सवाला यंदाही जयाद्री सखी कन्या परिवाराने आपली हजेरी लावली.आली.**



पुराणकथांनुसार खंडोबाची राजशाही दिवाळी गडावर साजरी करण्याची परंपरा आजही जपली जाते. पारंपरिक विधीनुसार भूपाळी आरतीने देवाची आळवणी करण्यात आली, तसेच देवसंस्थानच्या वतीने गडावर आकर्षक आकाशकंदील लावण्यात आला. जेजुरीच्या ऐतिहासिक रंगमहाल बालदारी येथे जयाद्री सखी परिवाराने पारंपरिक वेशभूषा परिधान करून रांगोळी काढत समयपूजन केले.

खंडोबाला प्रिय असलेल्या झेंडूच्या फुलांच्या माळा आणि हळदीचा हरिद्रचूर्ण कोटमा या प्रथेनुसार यंदाही गाभाऱ्यात अर्पण करण्यात आला. “हा सण केवळ धार्मिक नसून आपल्या संस्कृतीचा वारसा जपणारा उत्सव आहे,” असे मत जयाद्री सखी परिवाराच्या स्नेहल बाळासाहेब खोमणे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमात सानिका गाडवे, वैभवी गावडे, प्रणाली वैद्य यांसह अनेक कन्या सहभागी झाल्या. श्री मार्तंड देवसंस्थान विश्वस्त कमिटी, जयाद्री सखी कन्या परिवाराच्या वतीने तसेच गुरव, पुजारी, वीर, कोळी, घडशी समाज, खान्देकरी मानकरी, ग्रामस्थ व कर्मचारी वर्गाला दिवाळीच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

खंडोबाच्या ऐतिहासिक गडावर पारंपरिक वेशभूषेत साजरी झालेली ही दिवाळी भक्तिभाव, संस्कृती आणि सामाजिक एकतेचे सुंदर प्रतीक ठरली.

